मार्शाक

पिंजऱ्यातले पिटकुले

मार्शाक

पिंजऱ्यातले पिटकुले

चित्रे: चारूशिन
अनुवाद: अनिल हवालदार

प्रगती प्रकाशन
मॉस्को



हत्ती

हे दोन बूट दिलेत मला
थंडी पडेल तेव्हा ऊब आणायला.
आहेत सुंदर पण फारच पिटुकले
चार पाय आहेत मला मोठाले!

जिराफ

छोटुकल्या नि बुटक्या मुलाला
फुले तोडणे म्हणजे डाव्या हातचा मळ
पण आमच्यासारख्या लांबड्या मानेला
घालावा लागतो तासन् तास घोळ !



वाघाचा बच्चा

मनीमाऊ नव्हे मी वाघाचा बच्चा
हात लावाल तर खाऊन टाकीन कच्चा!



पेंग्विनची पिल्ले

मी आणि माझा जुळा भाऊ
अगदी आताच जन्मलो.
आमच्या आईला आम्ही कुठे शोधू ?
ही पेंग्विन आहे का ? तुम्ही विचाराल.

आमची नावे ठाऊक नाहीत आम्हाला
सगळाच अवघड बनला आहे मामला.
आम्ही हंस आहोत की बगळे ?
ठाऊक आहे आम्हाला ! आम्ही पेंग्विनची पिल्ले !

मागो माकड

जनावरखान्यात नवा मी, मागो माझे नाव
येऊन झाले थोडेच दिवस, आफ्रिका माझे गाव:
आणले सागरावरून खलाशी पोराने,
बसवले होते खोक्यात बंदिस्त चारी बाजूने.

कधीतरी आठवते घर, इथेही रमतो घडीभर.
खातो केळी नि पितो एक गंमत:
कॉडलिव्हर तेलाचा चमचा दिवसाला
डॉक्टरची गरज कधी भासणार नाही आम्हाला.



झेब्रा

सगळे झेब्रा एकूण एक,
घोड्याला भाऊ आहेत अनेक.
डोक्यापासून पायापर्यंत पट्टे,

गवतात पटकन दिसत नाहीत पट्टे
म्हणून खेळतात नि पळतात भरधाव
सारा दिवस चालतो लपंडाव.

हत्तीचे पिल्लू

हत्ती आमचा पिटुकला
उकाड्याने बेजार झाला,
अशा वेळी पाण्याचा फवारा
पळवून लावतो गरम वारा.
ज्या बाळाचे वजन टनभर
पुरणार कसे पाणी बादलीभर?

सिंहाचे दोन छावे

साऱ्यांना ठाऊक आहेत आमचे बाबा
जनावरखान्यातला सिंह म्हणजेच आमचे बाबा!
भले मोठे पंजे त्यांचे आयाळ मोठी भारी,
गर्जना ऐकताच त्यांची लोकांची उडते भंबेरी!

अशा मोठ्या सिंहाला आहार लागतो सकस
बाबांना देतात भरपूर मांस सरस.
पण आम्ही आहोत छावे म्हणून आमचा खाऊ
गोड गोड दूध आम्ही पितो भाऊ-भाऊ!

उंटाचे उपाशी पिल्लू

दिवसांमागून दिवस करतात माझी उपासमार,
कसा सहन करायचा सांगा हा भार?
माझ्यासारख्याच्या राक्षसी भकेला
दोन बादल्या काय पुरणार दाढेला?

पांढरी अस्वले

अशा सुंदरशा तलावात
डुंबायला येते गंमत!
बदलतात पाणी इथले वारंवार,
ठेवतात आम्हाला नेहमी गारेगार.

या भिंतीपासून त्या भिंतीपर्यंत
हरणार नाही आम्ही कधीच शर्यत!
"उजवीकडून जा, जागा आहे भरपूर,
धक्के मारून करता कशाला कुरकुर?"



शहामृगाचे पिल्लू

शहामृग अवघा मी सव्वा महिन्याचा,
गर्व फार मला ताकदीचा नि धिटाईचा,
कुणाही शत्रूवर बेधडक जातो
भल्या मोठ्या अंगठ्याने खंडीभर माती उकरतो.

घाबरतो तेव्हा मान लांबवून धावतो सुसाट,
पाठलागाला सर्वांच्या गंमत येते अफाट!
पण प्रयत्नांची शिकस्त करूनही,
जमले नाही गायला, जमले नाही उडायला.



कांगारू

दोघे करताहेत खूप खूप गंमत
जनावरखान्यात बेडूकउड्या मारत!
कांगारू जर तुम्ही असाल
खेळात त्यांच्या चटकन रमाल.

हंसाचे पिल्लू

हंसाच्या पिल्लाने मारली डुबकी
साऱ्या मोठ्या हंसांबरोबर.
थरथर कापते, अंगभर निथळते
टॉवेल द्या कुणीतरी भरभर!

एस्किमो कुत्रा

"सावध रहा!" अशी पाटी लावणे बरे का?
नका हो तिच्यावर कुणी विश्वास ठेवू.
जाणणारे मला म्हणतात सदा
मऊ कोकरासारखा आहे गरीबडा
म्हणून अचंबा वाटतो नेहमी मला
इतरांसारखा मला पिंजऱ्यात का डांबला?

पेंग्विन

दिसतो की नाही मी पोत्यासारखा?
एका बाजूला पांढरा तर दुसरीकडे काळा?
पण पाहिले असते मला कोणे एके काळी
वेगवान बोटींबरोबर धावण्यात होतो भारी
आता मात्र जीव इथे रमतो
छोटयाशा तळयात निवांत बसतो.

घुबडाची पिल्ले

ही घुबडाची पिल्ले, भाऊ सारे प्रेमळ,
बसतात नेहमी घट्ट चिकटून जवळ.
दुसऱ्यांशी कधी नाही मिसळत
काढतात झोपा किंवा बसतात हादडत

चिमणीचे भोजन

"चिमणी चिमणी सांग मला
जनावरखान्यात जेवलीस का?"
"होय, होय!

काल सकाळी न्याहरीच्या वेळेला
सिंहाला गेले होते भेटायला.

नंतर कोल्होबाबरोबर
फराळ केला घटकाभर.

पाणघोड्याबरोबर प्यायले पाणी,
आवडली मला त्याची मिठ्ठास वाणी.

नंतर म्हाताऱ्या हत्तीने नि बगळ्याने
खाऊ घातली हिरवी भाजी नि दाणे.

गेंड्याला भेटायला नाही चुकले
चिमूटभर कोंड्याला चवीने चाखले.

सुसरबाईबरोबर घेणार होते भोजन,
पण करायचे होते तिला माझेच भोजन!"

मुलांसाठी रशियन व सोविएत
पुस्तकमाला

© मराठी अनुवाद, प्रगती प्रकाशन, १९७५

सोविएत संघात मुद्रित

С. Маршак
ДЕТКИ В КЛЕТКЕ
На языке маратхи

मुलांसाठी रशियन व सोविएत पुस्तकमाला
प्रगती प्रकाशन
मॉस्को

$M \frac{70801-1129}{014(01)-75}$ 834-75